# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक २७/०७/२०१८**

## १)जबरी चोरी :-

**तामसा :-** दिनांक २५.०७.२०१८ रोजी चे १९.३० वा. चे सुमारास चिकाळा पाटीचे पुढे ता. हदगाव जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी व त्याचा मित्र टेम्पोचे टायर आनण्यासाठी वडगांव बु. ते भोकर जात असताना यातील नमुद तिन आरोपीतांनी संगणमत करुन त्यांची मो. सा. टेम्पो समोर लावुन फिर्यादीस चापटा मारुन पटयाने कमरेवर व पाटीवर मारहाण केली व फिर्यादीचे मित्रास धक्काबुक्की करुन शिवीगाळ केली व फिर्यादीचे खिशातील मोबाईल कि. अ. १,०००/-रुपयाचा व नगदी रक्कम ५,०००/-रुपये असा एकुण ६,०००/-रुपयाचा माल जबरीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी गोपाळ संजय हरन, वय १९ वर्षे व्यवसाय चालक रा. वडगांव (बु) ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. तामसा** गुरनं ६७/२०१८ कलम ३९२, ३४ भादंविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/माने , मो.क्र. ८७८८०४४०२०** हे करीत आहेत.

## २) चोरी

**वजिराबाद :-** दिनांक २५.०७.२०१८ चे ११.२० वा. चे सुमारास गुरूकृपा ज्वेलर्स सोमेश कॉलनी नांदेड येथे यातील फिर्यादी हा त्याचे दुकान उघडुन सोन्या चांदीचे दागने असलेली बॅग दुकानात ठेवुन आत दुसरे शटर उघडत असतांना निघत नसल्याने बाहेर येवुन दुसरे शटर बघीतले असता त्याला तार लावलेली असल्याने तो तार काढीत असतांना त्याची नजरचुकवून कुणीतरी अज्ञात चोरटयाने सोन्या चांदीचे एकुण १,३५,०००/-रुपयाचे दागीने चोरुन नेले. . वगैरे **फिर्यादी गोविंद रत्नाजी साखरे, वय ४९ वर्षे व्यवसाय व्यापार रा. शंकरनगर वसरणी नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरनं २०७/२०१८ कलम ३७९, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/नाईकवाडे, मो.क्र. ९८२३२०२५११** हे करीत आहेत.

## ३) फसवणुक :-

**वजिराबाद :-** मे २००७ ते दि. २६.०७.२०१८ रोजी चे १०.३० वा. चे दरम्यान कंपनी सन्मान टॉवर, वजिराबाद नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन यातील फिर्यादीसह एकुण ६८२ गुंतवणुक दारांची आरोग्य सेवा मोफत मिळेल, तसेच अपघात विमा मिळेल, दोन लाखपर्यंत उपचाराकरीता खर्च मिळेल, तसेच नऊ वर्षानंतर दाम दुप्पट रक्कम मिळेल असे फिनोमिनल सर्व्हिसेस प्रा. लि. मुंबई यांचे डायरेक्टर व संस्थापक संचालक यांनी आमिष दाखवुन मेंबरचे प्रमाणपत्र एकुण १,१४,४५,६०६/-रुपयाची फसवणुक केली. वगैरे वरुन **फिर्यादी मारोती पांडुरंग वाघमारे, वय ५५ वर्षे व्यवसाय शेती रा. प्रभातनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरनं २०६/२०१८ कलम ४२०, ४०६, ४६७, ४६८, ३४ भादवी ३,४ महाराष्ट्र ठेविदाराच्या संरक्षण अधि. २००४ अन्वये गुन्हा दाखल असून **तपास पोनि/शिवले, मो.क्रं. ९८२१६९२२६१** हे करीत आहेत.

## ४)दंगा :-मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**अ) उस्मानगर :-** दिनांक २५.०७.२०१८ रोजी चे २१.३० वा. चे सुमारास वाका ते उमरा फाटा ता. कंधार जि नांदेड येथे, यातील नमुद सकल मराठा मोर्चातील आरोपीतांनी मानवी जिवीतास धोका होईल अशा कृतीची प्रत्याक्षात चेतावणी देवुन यातील बस क्रमांम एम. एच. ४०/एन-९१८१ बसवर दगडफेक करुन काचा फोडुन सदर बसचे २,०००/-रुपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी माधव आनंदराव शिराळे, वय ४४ वर्षे व्यवसाय बस चालक मुखेड डेपो बॅच नं. २०९८१** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. उस्माननगर** गुरन ११४/२०१८ कलम ३३६, ४२७, १०९, ११७, ३४ भादवी सह कलम १३५ म.पो. का. अधि. १९५१ व कलम ३ सा. मा. नुकसान अधि. १९८४ कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ काथवटे, मो.क्र. ९६०४४०२९८०** हे करीत आहेत.

**ब) भाग्यनगर :-** दिनांक २४.०७.२०१८ रोजी चे १३.२५ वा. चे सुमारास राज कॉर्नर नांदेड येथे, यातील फिर्यादी हा शासकीय काम करीत असतांना यातील नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन सकल मराठा मोर्चातील आरोपीतांनी आंदोलनास चेतावणी देवुन एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे अशा जोरजोरात घोषणाबाजी देवुन जमावातील कांही लोकाना भडकावुन फिर्यादीच्या उजव्या बाजुचे तोंडाच्या जबडयावर दगड मारुन गंभीर जखमी केले व मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/१८०४ गणेश आनंदराव मिटके, पो. स्टे. विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन २३६/२०१८ कलम ३५३, ३३३, ३३६, १४३, १४७, १४८, १४९, भादवी सह कलम १३५ म.पो. का. अधि. १९५१ व कलम ३ सा. मा. नुकसान अधि. १९८४ व ७ (१) ड क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/आर. के. डमाळे, मो.क्र. ९०१११६४७७७** हे करीत आहेत.

**क) अर्धापुर :-** दिनांक २५.०७.२०१८ रोजी चे २२.१५ वा. चे सुमारास दशमेश पेट्रोल पंपासमोर सार्वजनिक रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा महामंडळाची बस क्रमांक एम. एच. -२०/बी. एल.३९८८ ही भोकर ते नांदेड जात असतांना यातील नमुद आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी एक मराठा लाख मराठा, मराठा समाजालाआरक्षण मिळालेच पाहीजे अशा जोरजोरात घोषणाबाजी देवुन हातातील लाकडोन सदर बसच्या काचा फोडुन अंदाजे ४०,००० ते ५०,०००/-रुपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी माधव मारोती भुजबळ, वय ४६ वर्षे व्यवसाय नौकरी बस चालक रा. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. अर्धापुर** गुरन १५८/२०१८ कलम ४२७, ३४, भादवी सह कलम ४ सा. मा. नुकसान अधि. १९८४ कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/६९४ काळे, मो.क्र. ८००७५७९०२७** हे करीत आहेत.

**ड) अर्धापुर :-** दिनांक २५.०७.२०१८ रोजी चे २३.५५ वा. चे सुमारास येळेगाव फाटा ता. अर्धापुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा महामंडळाची बस क्रमांक एम. एच. -२०/बी. एल.३९८८ ही नांदेड ते भोकर जात असतांना यातील नमुद आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी गैरकायदयाची मंडळी जमवुन रस्ता आडवुन सदर बसच्या काचा फोडुन अंदाजे ७०,००० ते ८०,०००/-रुपयाचे नुकसान केले मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी विलास किशनराव कुंभार, वय ३० वर्षे व्यवसाय नौकरी बस चालक, एस. टी. महामंडळ रा. धारोळा ता. चाकुर जि. लातुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. अर्धापुर** गुरन १५९/२०१८ कलम १४३, १४७, १४९, ३४१, ४२७, भादवी सह कलम ४ सा. मा. नुकसान अधि. १९८४ , १३५ मु.पो.का कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५६६ कोकरे , मो.क्र. ९८२३७१४५६६** हे करीत आहेत.

## ५) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**अ) कुंटूर :-** दिनांक २६.०७.२०१८ रोजी चे ०४.०० ते ०६.०० वा. चे दरम्यान नांदेड ते नायगाव जाणारे रोडवर मैदामिल फॅक्ट्रीचे बाजुस ता. नायगाव जि. नांदेड येथे यातील यातील **मयत नामे अनोळखी** यास अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहान हयगई व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन मयत इसमास धडक देवुन मरणास कारणीभुत झाले. वगैरे **फिर्यादी श्यामसुंदर व्यंकटराव ढगे, वय ४८ वर्षे व्यवसाय शेती रा. घुंगराळा ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन ११४/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/बिरादार, मो.नं. ८८३०१६६४७७** हे करीत आहेत.

**ब) सिंदखेड :-** दिनांक २६.०७.२०१८ रोजी चे ०२.३० वा. चे सुमारास माहुर ते सारखणी रोडवर ता. माहुर जि. नांदेड येथे यातील **मयत नामे १) रुकमीनबाई केशव वंजरी, वय ७० वर्षे, २) नर्मदाबाई दुलाजी बोंबले, वय ५५ वर्षे दोघी रा. धनज ता. उमरखेड जि. यवतमाळ** हे व गावतील इतर स्त्री पुरुष असे पिक अप वाहन क्रमांक एम. एच. २९/बी. ई. ०२३२ मध्ये बसुन दुलाजी बाबाचे दर्शनासाठी पटनापुर ते जि. आदिलाबाद येथे जात असतांना यातील नमुद आरोपीने आपले वाहन हयगई व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन रोड लगत असलेल्या लिंबाचे झाडास धडक देवुन पाठीमागे बसलेल्या महिलांचे मरणास कारणीभुत झाले तसेच वाहानातील इतर लोकास गंभीर व किरकोळ दुःखापत केली. व वाहानामध्ये मर्यादेपेक्षा जास्त लोकांना बसवलि. वगैरे **फिर्यादी श्रीराम सखाराम गुव्हाडे, वय ४९ वर्षे व्यवसाय शेतमजुरी रा. धनज पोस्ट मुळावा ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. सिंदखेड** गुरन ७३/२०१८ कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ), भादंवि सह कलम ६६/१९२ मो. वा. कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१८३५ मडावी, मो.नं. ०२४६०-२६०७३३** हे करीत आहेत.

## ६) आर्मस् ॲक्ट :-

**देगलुर :-** दिनांक २६.०७.२०१८ रोजी चे १२.१५ वा.चे सुमारास आण्णाभाऊसाठे चौक देगलुर जि. नांदेड येथे यातील नमुद ठिकाणी नमुद आरोपीने नमुद ठिकाणी बिना परवाना बेकायदेशिररित्या स्वतःचे ताब्यात धारधार सुरा बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/९३५ शेरीफखान हबीबखॉन पठाण, पो. स्टे. देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. देगलुर** गुरनं २३४/२०१८ कलम ४/२५, भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/१६७७ ताहेर, मो.क्र. ८४२१४३७०७०** हे करीत आहेत.

## ७) गळफास घेवुन मृत्यु :-

**मुखेड** :- दिनांक २६.०७.२०१८ चे १५.३० वा. चे सुमारास इंगोले हॉस्पीटल यांचे दुसऱ्या मजल्यावर मुखेड जि. नांदेड येथे यातील **मयत नामे योगेश वैजनाथ पांचाळ, वय १९ वर्षे व्यवसाय शिक्षण रा. निपाणी सावरगावह. ह. मु. मुखेड जि. नांदेड** हा नमुद ठिकाणी इंगोले हॉस्पीटलच्या वरच्या मजल्यावर किरायाचे रुममध्ये गळफास घेवुन मरण पावला. वगैरे **खबर देणार विश्वनाथ मारोती इंगोले, वय ३८ वर्षे व्यवसाय मेडीकल रा. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुखेड** आ.मृ. २६/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोउपनि/सावंत, मो.क्र. ९४०३४१४१०१** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.